**नि.फौ.ख.क्र.८२४/२०१३.**

**निशाणी क्रमांक १०५२/क.**

**साक्षीदार क्रमांक ०१**

**सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,**

**माझे नाव** — चेतन विजय घोरपडे,

**वय वर्ष** — ४७, **व्यवसाय** — डॉक्टर,

**राहणार** — ताराबाई पार्क, कोल्हापूर.

**अभियोगपक्षातर्फे सरतपास शपथेवर सहा.सर.वकील श्री.एस.जे.सरनोबत यांचे मार्फत सुरु...**

**०१.** माझे एम.बी.बी.एस. व एम.एस.कान, नाक व घसा तज्ञ असे झाले आहे. मी सी. पी.आर.हॉस्पीटल येथे मार्च २००५ पासून अधिव्याख्याता व त्यानंतर सहयोगी प्राध्यापक कान, नाक व घसा म्हणुन सन २०१७ पर्यंत कार्यरत होतो. माझ्या कामाचे स्वरुप स.०९.०० ते ०१.०० बाहय रुग्न विभाग, कान, नाक व घसा व एक दिवस शस्त्रक्रिया असे होते तसेच दु.०२.०० ते ०५.०० प्रशासकीय व शैक्षणिक काम असे होते.

**०२.** दि.०८/०८/२०१२ रोजी बाहय रुग्ण विभाग येथे संदीप बुरुड नावाची व्यक्ती आली होती. त्यांच्याकडे फोनेक वाचा श्रवण विकार केंद्र यांचा अहवाल होता. अहवालानुसार बहिरेपणाचा अपंगत्वाचा दाखला मिळण्याकरीता ते माझ्याकडे आले होते. सदर अहवालाची मी पाहणी केली असता समोरच्या पानावर मेडीकल भाषेत आलेख होता. परंतु त्यांच्या मागील पानावर शेरा व सही आवश्यक असते ती नव्हती. सदरचा अहवाल दि.१९/०७/२०१२ रोजीचा होता. तो अहवाल घेऊन मी अहवाल देणा-या पुष्पांजली दुर्गानंद सोळंखी यांच्याशी सपर्क केला. त्यानंतर त्यांनी मला त्यांच्याकडील अभिलेखाची पाहणी करुन सदर नावाची व्यक्ती दि.१७/०७/२०१२ रोजी येऊन गेली असे सांगितले व त्यांनी अहवालावर सही व शेरा करुन दिल्याचे खात्रीलायक सांगितले.

**०३.** अहवालावरुन खात्री केल्यानंतर रुग्णाला आत बोलावून विचारले की त्यांनी सदरचा अहवाल कोठून मिळवला आहे. त्यावर त्यांनी सावंत साहेब यांनी पुर्वी तपासणी करुन

घेतली आहे व अहवाल दिला आहे असे सांगितले. त्यानंतर आमचे वरिष्ठ अधिष्ठाता डॉ.रघुजी थोरात यांना सदर अहवालाबाबत व प्रसंगाबाबत कळवले. त्यांनी देखील पुष्पाजंली मॅडम यांना सदर अहवालाची पुन्हा एकदा खात्री करण्यास सांगितले. त्यावेळी पुष्पाजंली मॅडम यांनी सदरचा अहवाल त्यांच्या केंद्रामध्ये बनवला नसल्याचे सांगितले.

**०४.** सदर घटनेनंतर आमचे विभाग प्रमुख तसेच वरिष्ठ अधिष्ठाता श्री.थोरात यांनी जुन २०११ ते ऑगस्ट २०१२ या कालावधीमधील जुने रेकॉर्ड तपासले. रेकॉर्ड पाहणीदरम्यान एकूण ११० हुन अधिक शंकास्पद अहवाल मिळून आले. घटनेदिवशी आणखी एक व्यक्ती शुभांगी जयसिंग पाटील व त्यांचे पती शुभांगी पाटील यांचा बहिरेपणाच्या अपंगत्वाच्या दाखला मिळवण्या -करीता आल्या होत्या. त्यांनी देखील फोनेक वाचा श्रवण विकार केंद्र यांच्याकडील अहवाल दाखवला. सदरचा अहवाल हा शंकास्पद वाटल्यामुळे आम्ही पुन्हा एकदा पुष्पांजली मॅडम यांना फोन करुन खात्री केली असता सदरचा अहवाल दिलेली तारीख त्यांच्याकडे पेशंटने तपासणी केलेली तारीख यामध्ये तफावत आढळून आली.

**०५.** एखादा व्यक्ती बहिरेपणाचा अपंगत्वाचा दाखला मिळवण्याकरीता येतो त्याला सी.पी.आर. येथील कान, नाक, घसा बाहय रुग्ण विभाग यांच्याकडे तपासणी होती. पुर्वी सन २०१० पर्यंत याची तपासणी सी.पी.आर.येथे ऑडीओलॉजिस्ट उपलब्ध असल्याने होत होती. त्यानंतर त्याला श्रवण आलेख तपासणीकरीता फोनेक वाचा श्रवण विकार केंद्र किंवा रोटरी वाचा श्रवण विकार केंद्र येथे पाठविले जाते. त्यानंतर तपासणी करुन अहवालावर शेरा व सही घेऊन रुग्ण पुन्हा सी.पी.आर. येथे पुढील तपासणीकरीता येतो. श्रवण आलेख व तपासणी अहवाल याची सांगड घालुन रुग्णाला अपंगत्वाचा दाखला दिला जातो. अपंगत्वाच्या दाखल्यावर कान, नाक, घसा तज्ञांची, वैद्यकीय अधिक्षक, उपअधिक्षक अशा तिघांच्या सहया असतात. दाखल्यावर तज्ञांची सही कागदाच्या डाव्या बाजुला तसेच फोटोवर अशा दोन ठिकाणी असतात. सदरची घटना घडल्यानंतर वरिष्ठांच्या आदेशाने मी लक्ष्मीपुरी पोलीस ठाणे येथे फिर्याद दिली. आता मला सदरची फिर्याद दाखविण्यात आली. ती तीच असून त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मी सांगितल्याप्रमाणे खरा व बरोबर आहे. फिर्यादीस **नि.क्र.१०५३** देण्यात येते. घटनेला बरीच वर्ष झाल्यामुळे तसेच रोज बरेच पेशंट तपासले जात

असल्यामुळे संदिप बुरुड व शुभांगी पाटील यांना पाहिल्यास मी ओळखू शकत नाही. पोलीसांनी माझा जबाब नोंदविला होता. काही तांत्रिक कामांसाठी पोलीसांनी मला पोलीस ठाण्यात बोलाविले होते.

**<u>आरोपी क्र.०१, ०२, २१ व ५७ तर्फे विधिज्ञ श्री.जे.ए.पिटर-बारदेस्कर यांच्यामार्फत उलटतपास सुरु...</u>**

**०६.** हे म्हणणे खरे आहे की, श्रवण आलेख केंद्र हे सी.पी.आर.मध्ये मार्च, २०१० कार्यरत होते. त्यावेळी पुष्पांजली मॅडम व अजुन एक पुरुष डॉक्टर ते काम पाहत होते. हे म्हणणे खरे नाही की, मार्च, २०१० पुर्वी पुष्पांजली मॅडम या फोनेक वाचा श्रवण विकार केंद्र व सी. पी.आर. हॉस्पीटल येथे काम करत होत्या. फोनेक वाचा श्रवण विकार केंद्र या व्यतिरिक्त कोल्हापूर येथे तीन वाचा श्रवण विकार केंद्र होते. श्रवण अहवाल हे जास्तीत जास्त पुष्पांजली मॅडम यांच्या केंद्राचे होते. इतर केंद्रातील अहवालांची संख्या मला सांगता येणार नाही. फोनेक वाचा श्रवण विकार केंद्र येथे रुग्ण सी.पी.आर.मधुन पाठवले जायचे. फोनेक वाचा श्रवण विकार केंद्र येथे जाण्यापुर्वी सी.पी.आर.हॉस्पीटल येथे केस पेपर काढावा लागत असे. केस पेपरचे रजिस्टर सी. पी.आर.हॉस्पीटल येथे असते. अहवाल आल्यानंतर सी.पी.आर.चे रजिस्ट्रार राजश्री बकरे मॅडम यांच्याकडे प्रमाणपत्रासाठी लागणा-या कागदपत्रांची पुर्तता करावी लागत असे. रजिस्ट्रार यांच्या नोंदीचे वेगळे रजिस्टर असायचे. आमच्या विभागामध्ये चार तपासणीचे टेबल होते. आमच्या विभागामध्ये वैद्यकीय अधिकारी, सहा.प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व प्राध्यापक असतात. आमच्या विभागामध्ये रुग्णाची तपासणी झाल्यानंतर तात्काळ वाचा श्रवण विकार केंद्र येथे पाठविले जाते. ज्यांना प्रमाणपत्र दिले आहे अशा व्यक्तीचा केस पेपर सी.पी.आर.येथे जमा असतो. संदीप बुरुड व शुभांगी पाटील यांचे केस पेपर मिळाले होते. ज्या व्यक्तींना प्रमाणपत्र दिले गेले अशांचे केसपेपर मी व्यक्तीश: पाहिलेले नाही. फिर्याद दिल्यानंतर पोलीसांनी सी.पी.आर. येथे रेकॉर्ड जप्त केले. प्रमाणपत्र देण्याचे काम मी, डॉ.थोरात सर, डॉ.संदेश बागडी व डॉ.अजित लोकरे असे करत होतो. मिळालेल्या रेकॉर्डमध्ये तपासणीचे अहवाल माझ्या तसेच डॉ.थोरात सर, डॉ. संदेश बागडी व डॉ.अजित लोकरे यांच्या हस्ताक्षरातील सहीचे आहेत. आम्ही तपासणी केल्या -नंतर तसेच श्रवण आलेख प्राप्त झाल्यानंतर प्रमाणपत्र दिले गेले आहे. प्रमाणपत्र देण्याचे कामकाज रजिस्ट्रार बकरे मॅडम

करतात. प्रमाणपत्रावर सिव्हील सर्जनच्या सहीची आवश्यकता नसते. हे म्हणणे खरे आहे की, सदरची फिर्याद ही संशयावरुन दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, दाखल केलेल्या फिर्यादीस कोणताही कायदेशीर आधार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींविरुध्द खोटी फिर्याद दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी न्यायालया -समोर खोटी साक्ष देत आहे.

**उलटपास पुर्ण...**

**फेरतपास नाही...**

**आरोपी क्र.०६, ०७, ०९, १०, २१, २३, २४, २७, ३०, ३१ ते ३३, ३७, ४१ ते ४५, ४८, ५२, ५३, ६६, ६७, ७१, ७४, ७३, ८३ ते ८५, ८७, ९०, ९२, ९९, १०५, १०८, १३० व १३१ तर्फे विधिज्ञ श्री.बी.एम.शास्त्री यांच्यामार्फत उलटतपास सुरु...**

**०७.** दि.१८/११/२०१० रोजी बहिरेपणाच्या अपंगत्वाचा दाखला कसा द्यावा याबाबत सरकारकडून नियमावली जाहीर झाली होती व ती आम्हाला मिळाली आहे. महाराष्ट्रातील अपंगात्वाच्या कायद्यांचा परामर्ष घेऊन प्रस्तुतची नियमावली सरकाडुन जाहीर करण्यात आली. नियमावलीनुसार तीन तज्ञांची कमिटी हॉस्पीटलने नेमायची आहे. त्या कमिटीने रुग्णाची तपासणी करायची आहे. त्यानंतर रुग्णास अपंगत्वाचे प्रमाणपत्र देत असताना त्याचा फोटो, आधार कार्ड घेऊन रितसर रजिस्टरला नोंदवुन द्यायचे आहे. दिलेल्या प्रमाणपत्रांची रजिस्टर पोलीसांकडे हजर केलेले आहे. सदरचे रजिस्टर विभाग प्रमुख यांच्या उपस्थितमध्ये रजिस्ट्रार यांनी पोलीसांच्या ताब्यात दिले आहे. प्रमाणपत्र माझ्या सहीने दिलेले आहे. तीन सदस्यांच्या कमिटीमध्ये मी एक सदस्य आहे.

**०८.** फोनेक वाचा श्रवण विकार केंद्र यांच्याकडील अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्याची शहानिशा करण्याकरीता सी.पी.आर. येथे यंत्रणा उपलब्ध नाही. हे म्हणणे खरे आहे की, फोनेक वाचा श्रवण विकार केंद्र यांच्याकडुन प्राप्त झालेल्या अहवालावर विश्वास ठेवुन आम्ही प्रमाणपत्र देतो. मी दिलेल्या प्रमाणपत्रावर सही करण्यापुर्वी पुन्हा एकदा खात्री करावी असे वाटले नव्हते. तीन सदस्यांपैकी दुसरा एक सदस्य कान, नाक, घसा तज्ञ आहे. फोनेक वाचा श्रवण विकार केंद्राच्या गुरवळ मॅडम या माझ्या पुर्वी सहकारी असल्यामुळे मी त्यांना ओळखतो.

त्यांचे हस्ताक्षर व सही मी ओळखत होतो. त्यामुळे प्रमाणपत्रावरील सहया व हस्ताक्षर मी ओळखत होतो. त्यामुळे प्रमाणपत्रावर काहीही अवैध्य नाही असे मला वाटत होते. आरोपींना दिलेले प्रमाणपत्र खरे आहेत.

**०९.** सदरचे प्रमाणपत्र हे दि.०१/०६/२०११ ते ०८/०८/२०१२ या कालावधीमध्ये दिलेले प्रमाणपत्र आहेत. सरकारी नियमावली सन २०१० मध्ये जाहीर झाली व त्यानुसार प्रमाणपत्र दिले. दि.०१/०६/२०११ पुर्वीचे तसेच दि.०८/०८/२०१२ रोजीनंतरचे कोणतेही रेकॉर्ड नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीमध्ये नमुद प्रमाणपत्र क्र.०१ ते ७९ माझ्या सहीने दिलेले आहेत. परंतु त्या वरिष्ठांनी तपासणीमध्ये शोधुन काढले व मला सांगितले. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादमध्ये नमुद प्रमाणपत्र क्र.०१ ते ७९ हे मी स्वत: सांगितलेले नाहीत. दि.०१/०६/२०११ ते ०८/०८/२०१२ या कालावधीमध्ये शस्त्रक्रिया झालेल्या नोंदी रजिस्टर -मध्ये आहेत. प्रमाणपत्र क्र.०१ ते ७९ मध्ये शस्त्रक्रिया झालेल्या रुग्णांच्या नोंदी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, पर्यायाने माझ्याकडे कामाचा कार्यभार असल्यामुळे मी फिर्याद दिली आहे. माझ्या -प्रमाणेच इतर सदस्यांना देखील घटनेची माहिती आहे. तपासादरम्यान पोलीस आमच्यासोबत होते. रुग्णांना दिलेले प्रमाणपत्र पोलीसांनी जप्त केले आहे. प्रमाणपत्र जप्त करण्यापुर्वी पोलीसांनी मला प्रमाणपत्र खरे किंवा खोटी आहेत याबाबतची खात्री करण्याकरिता सांगितले नव्हते. जप्त प्रमाणपत्र मला दाखवले होते. ते प्रमाणपत्र खोटे आहेत असे वाटले नाही. पोलीसांना प्रमाणपत्र खरे आहेत हे माहित होते. अनेक रुग्णांचे शस्त्रक्रिया झाल्याचे कागदपत्र पोलीसांनी जप्त केले. त्या शस्त्रक्रियेनंतर श्रवण आलेख घेतला त्यानुसार टक्केवारीमध्ये प्रमाणपत्र दिले. श्रवण आलेख नसेल तर व्यक्तीला पाहुन त्यांच्यामध्ये बहिरत्व आहे हे सांगू शकत नाही.

**१०.** बहिरेपणा हा नैसर्गिक आपत्तीमुळे, अपघातामुळे आणि अनुवांशिकपणे येऊ शकतो. श्रवण आलेखामध्ये बहिरेपणा नेमका कोणत्या कारणामुळे आला हे सांगता येत नाही. रुग्ण तपासणीकरीता आल्यानंतर त्याचा इतिहास विचारला जातो त्याची नोंद देखील केसपेपरमध्ये केली जाते. एखाद्या व्यक्तीची बाहेरच्या रुग्णालयात शस्त्रक्रिया झाल्यास खाजगी डॉक्टरांना तसा अहवाल देता येत नाही. बहिरत्व आलेल्या प्रत्येक व्यक्तीला बाहेर उपचार घेऊन देखील प्रमाणपत्र घेण्याकरीता सी.पी.आर. येथेच यावे लागते. प्रमाणपत्र देत असताना

देखील रुग्णांचा पुर्व इतिहास विचारला जातो. अशा अनेक व्यक्तीना मी तपासुन प्रमाणपत्र दिलेले आहे. श्रवण आलेख खोटा दिल्यामुळे आम्हाला प्रमाणपत्र द्यावे लागले. श्रवण आलेख दिल्यानंतर मी पुन्हा एकदा तपासणी न करता प्रमाणपत्र दिले. आरोपींनी कोणताही गुन्हा केलेला नसताना स्वत:ला वाचवण्याकरीता आरोपींविरुध्द खोटा गुन्हा दाखल करुन आरोपींविरुध्द खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही मी, मी आज न्यायालयासमोर खोटी साक्ष देत आहे.

**उलटपास पुर्ण...**

**फेरतपास नाही...**

**<u>आरोपी क्र.६२ तर्फे विधिज्ञ श्री.यु.डी.वाडकर यांच्यामार्फत उलटतपास सुरु...</u>**

**११.** आता मला पोलीसांनी दाखल केलेली नियमावली दाखविण्यात आली. ती तीच असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. नियमावलीचे आम्हाला तंतोतंत पालन करावे लागते. हे म्हणणे खरे नाही की, गुरवळ मॅडम माझ्या सहकारी आहेत त्यामुळे त्यांना वाचवण्यासाठी मी आज रोजी न्यायालयासमोर खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे आहे की, सर्व प्रमाणपत्र खरे आहेत.

**उलटपास पुर्ण...**

**फेरतपास नाही...**

**मध्यांतर भोजणाच्या कालावधीमुळे सदरचा उलटतपास तहकुब....**

**मध्यांतर भोजणाच्या कालावधीनंतर पुढील उलटतपास शपथेवर सुरु...**

**<u>आरोपी क्र.९३, १२७ तर्फे विधिज्ञ श्री.डी.आर.कवाळे यांच्यामार्फत उलटतपास सुरु...</u>**

**१२.** हे म्हणणे खरे आहे की, रुग्ण पहिल्यावेळेस हॉस्पीटलमध्ये आल्यानंतर त्याला शुल्क भरुन केस पेपर काढावा लागतो. त्याला होत असलेल्या त्रासावरुन संबंधित विभागाकडे तो केस पेपर वर्ग केला जातो. केस पेपरवर कान, नाक, घसा यांचा शिक्का मारुन तो आमच्या विभागाकडे वर्ग केला जातो. कान, नाक, घसा या विभागाकडे गेल्यानंतर रुग्णाची ज्यु.डॉक्टर प्राथमिक तपासणी करतात. त्या अनुषंगाने त्या रुग्णाचा अहवाल सिनियर डॉक्टरांकडे दिला जातो. सिनियर डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार रुग्णांस श्रवण आलेख तपासणी करीता केंद्राकडे पाठविले जाते. श्रवण आलेख अहवाल रुग्ण आमच्या विभागाकडे जमा करतात. हे म्हणणे खरे

आहे की, श्रवण आलेख अहवाल तपासल्यानंतर संबंधित विभागाकडे प्रमाणपत्र देण्याकरीता वर्ग केले जाते. हे म्हणणे खरे आहे की, डॉक्टर ज्याप्रमाणे सांगतात त्याप्रमाणेच केसपेपर काढण्या -पासुन ते प्रमाणपत्र मिळेपर्यंत रुग्ण सुचनांचे पालन करतात. त्यामध्ये रुग्णांचा प्रत्यक्ष सहभाग नसतो. श्रवण आलेख अहवाल हा फोनेक वाचा श्रवण विकार केंद्र यांच्याकडून येत होते. प्रस्तुत केंद्रांच्या संचालिका गुरवळ मॅडम होत्या. गुरवळ मॅडम या सी.पी.आर. हॉस्पीटल येथे काम करत होत्या. प्रमाणपत्र देण्याचा अधिकार केवळ तज्ञांना असतो. हे म्हणणे खरे नाही की, वरिष्ठांच्या चुकांवर पांघरुन घालण्यासाठी मी खोटी फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी आरोपींविरुध्द खोटी साक्ष देत आहे.

**उलटपास पुर्ण...**

**फेरतपास नाही...**

**<u>आरोपी क्र.३४, ३९, ५५, ६८, १०७, १०९, १११, ११३, ११६, ११७ तर्फे विधिज्ञ श्री.डी.जी.पाटील यांच्यामार्फत उलटतपास सुरु...</u>**

**१३.** हे म्हणणे खरे आहे की, डिसअॅबिलीटी टेस्टमध्ये त्रुटी असु शकतात. हे म्हणणे खरे आहे की, तज्ञांनी केलेल्या डिसअॅबिलीटी टेस्टमध्ये तफावत येऊ शकते. डिसअॅबिलीटी ही रुग्णाला आवाज किती ऐकू जातो यावरुन ठरवली जाते. जर त्या मशिनमधुन आवाज कमी गेला तर ती टेस्ट चुकू शकते. श्रवण आलेख चुकल्यास रुग्णाच्या डिसअॅबिलीटीच्या टक्केवारीवर परिणाम होऊ शकतो. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी आरोपींविरुध्द खोटी साक्ष देत आहे.

**<u>आरोपी क्र.२८, ५४, ११७ तर्फे विधिज्ञ श्री.जे.व्ही.खाडे यांच्यामार्फत उलटतपास सुरु...</u>**

**१४.** दि.०८/०८/२०१२ रोजी घटना घडली. दि.२२/०८/२०१२ रोजी फिर्याद दाखल करण्याकरीता मला तोंडी आदेश दिले. घटनेच्या दिवशीच मला तक्रार द्यायला काहीही हरकत होती. दि.०८/०८/२०१२ रोजी पासून ते दि.२२/०८/२०१२ या कालावधीमध्ये कॉलेज अंतर्गत चौकशी केली त्याबद्दल मला काही माहिती नाही. आरोपी क्र.११७ शुभांगी जयसिंग पाटील यांची तपासणी झाली कि नाही हे मला सांगता येणार नाही. प्रस्तुतची फिर्याद मी शासकीय कामकाजाचा भाग व वरिष्ठांचा आदेश म्हणुन दिली. आरोपी क्र.११७ च्या

ताब्यातील जप्त केलेले प्रमाणपत्र प्रस्तुत कामी दाखल केलेले असतील. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.११७ यांच्याकडून कोणताही तपासणी अहवाल श्रवण आलेख जप्त केलेला नाही.

**उलटपास पुर्ण...**

**फेरतपास नाही...**

**सदरचा उलटतपास आरोपी क्र.१२६ तर्फे विधिज्ञ श्री.के.व्ही.पठाडे, आरोपी क्र.४६ व ४७ तर्फे विधिज्ञ श्री.व्ही.एस.बन्ने, आरोपी क्र.११ तर्फे विधिज्ञ श्री.एम.के.पाटील, आरोपी क्र.१७ तर्फे विधिज्ञ श्री.आर.जे. हिलाल, आरोपी क्र.७०, ९१, १५, ८०, १९, २५, २६ व ६८ तर्फे विधिज्ञ श्री.एस.आर.शिंदे, आरोपी क्र.३ ते ५ तर्फे विधिज्ञ श्री.ए.जे.देशपांडे, आरोपी क्र.१३, २९, ३६, ४०, ६४, ६५, ९७ तर्फे विधिज्ञ श्री.व्ही.ए.सावंत, आरोपी क्र.१०४ तर्फे विधिज्ञ श्री.एस.आर.तांबे, आरोपी क्र.११८ तर्फे विधिज्ञ श्री.पी.पी.साठे-पाटील, आरोपी क्र.१२२ तर्फे विधिज्ञ श्री.व्ही.डी.म्हांगोरे, आरोपी क्र.१२१ तर्फे विधिज्ञ श्री.एम.के.पाटील, आरोपी क्र.११४ तर्फे विधिज्ञ श्री.व्ही.एस.निकम, आरोपी क्र.१३२ तर्फे विधिज्ञ श्री.ए.व्ही.हिलगे, आरोपी क्र.५१ तर्फे विधिज्ञ श्री.एस.एस.चौगले, आरोपी क्र.७४, ७५ व ७७ तर्फे विधिज्ञ श्रीमती पी.व्ही. कांबळे, आरोपी क्र.७६ तर्फे विधिज्ञ श्री.एच.आर. खंडेलवाल, आरोपी क्र.५८ ते ६० व १३४ तर्फे विधिज्ञ श्री.व्ही.ए.पाटील, आरोपी क्र.३८ व ९५ तर्फे विधिज्ञ श्री.सी.व्ही.पाटील यांनी स्वीकारला....**

**''श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत''**

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SHILPA VISHVESH KULKARNI
Date: 2026.05.04 12:32:48 +0530

( शिल्पा वि. कुलकर्णी )

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

न्यायालय क्र.१४, कोल्हापूर.

दि.२७/०४/२०२६.